Vol 4 Issue 11 Dec 2014

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-11 | Dec-2014
Available online at www.isrj.org

# मराठी ऐतिहासिक कादंबरी व नाटकांची निर्मितीप्रेरणा

प्रा. प्रफुल्ल तु. बन्सोड

मराठी विभाग , राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय,चिमूर, जि. चंद्रपूर (म.रा.)

***सारांश*** :मराठी वाङमयाचा विचार करतांना असे दिसून येते की, मराठी वाङमयात कथा, कादंबरी, नाटक, कविता हे वाङमयप्रकार अतिशय समृध्दावस्थेत आहेत. या सगळया वाङमय प्रकारांमध्ये विविध भेद आहेत. उदा. सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, चरित्रात्मक इत्यादी या भेदातून हे वाङमय प्रकार आपला प्रवास करीत आहेत. यातूनच 'ऐतिहासिक मराठी नाटक' आणि 'ऐतिहासिक मराठी कादंबरी' हे शब्द प्रयोग सर्रास रूढझालेले आहेत आणि त्यांच्या नित्य वापरामुळे ते वाचकांच्या अंगवळणी पडलेले आहेत. पण इतिहास आणि ललितकृती ह्या दोहोच्या घटकांचा विचार केला तर परस्पर विरूध्द गुणधर्मानी युक्त अशा शब्दाची ही युती जमलेली आहे असे वाटायला लागते. कारण इतिहास हे सत्यशोधनाचे शास्त्र आहे. त्यामध्ये निःपक्षपाती व वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून वस्तुस्थितीचे यथार्थ कथन करण्याची इतिहासकाराची प्रतिज्ञा असते, तर साहित्य, काव्य किंवा ललित वाङमय हे प्रतिभेच्या व कल्पनाशक्तीच्या सहाय्याने कल्पीत कथेच्या स्वरूपात अवतरत असते. या संदर्भात गो. ची. माटे यांनी म्हटल्याप्रमाणे, ''कादंबरी म्हणजे अद्‌भूत पण 'न भूतो न भविष्यती' अशा प्रसंगांनी भरलेली कल्पीत कथा होय, तर इतिहास म्हणजे अद्‌भूत पण भूतार्थ प्रसंगानी भरलेला वृत्तांत होय.''[१]

प्रस्तावना :–

कादंबरी व नाटक ही आत्मविष्कारार्थ नसतात तर निवेदनार्थ असतात. म्हणजेच येथे वाचकांचा संबंध येतो. कादंबरीकार व नाटककार ऐतिहासिक सत्य व वर्तमानकालीन वाचक या दोहोंचे भान ठेऊन नाटक अथवा कादंबरी निर्माण करित असतात. ''ऐतिहासिक हे कादंबरी वा नाटक यांचे विशेषण आहे लक्षण नव्हे. जशी 'सामाजिक', 'राजकीय' हे विशेषण होत. तशी मात्र 'ऐतिहासिक' हे 'सामाजिक', 'राजकीय' याप्रमाणे नुसते विशेषण राहात नसून ते कादंबरी – नाटक यांच्या लक्षणांकडे झुकते कारण इतिहासातील ज्या व्यक्ति, प्रसंग, घटना, कादंबरीत वा नाटकात रंगविलेल्या असतात त्या जशाच्या तशा ठेवाव्या लागतात. त्यांना काल्पनीक रूप देता येत नाही. आपल्या साहित्यकृतिसाठी निवडले असेल ते कल्पनेच्या पातळीवर नेऊन त्यांनी तत्कालीकाला सर्वकालीन रूप दिले पाहिजे. असे जेव्हा होईल तेव्हाच ऐतिहासिक सत्य कलात्मक बनू शकते आणि त्यातून ऐतिहासिक कादंबरी व नाटक निर्माण होते.''[२] सामाजिक व राजकिय नाटकाहून 'ऐतिहासिक' कादंबरीत वा नाटकात ऐतिहासिकाला अधिक महत्व असते. यादृष्टीने ऐतिहासिक नाटक व ऐतिहासिक कादंबरीच्या रचना तंत्राचा विचार करणे अगत्याचे ठरते.

### *ऐतिहासिक कादंबरीचे रचना तंत्र :–*

प्रतिभावंताची अनुभूती आपले वैशिष्टयपुर्ण रूप धारण करून अविष्कृत होत असते. त्याच्या अविष्काराने स्विकारलेल्या घाटावरूनच त्या कलेच्या अविष्कारामागे एक तंत्र असते. काही संकेत असतात. इतिहास, पुराण, महाकाव्य, चरित्र, बखर यांच्याशी जवळीक असूनही ऐतिहासिक कादंबरी निराळी असते. तिला इतिहासाशी निष्ठा ठेवावीच लागते. साहित्याला वाचकांच्या मनावर होणारा परिणाम लक्षात घेता चुकीचा इतिहास रूढ होणार नाही, याबाबतही निष्ठा जागरूकतेने सांभाळली जाते. तथापी, ललित साहित्यकृतिच्या एकात्म परिणामाच्या दृष्टीने ऐतिहासिक सत्य आणि लेखकाची सृजनशील कलात्मक कल्पकता ही दोन्ही परस्परपुरक आणि पोषक असणे आवश्यक असते. त्यामुळे ऐतिहासिक कादंबरी हा तांत्रीकदृष्टया एक वैशिष्टयपूर्ण वाङमय प्रकार म्हणावा लागतो.

## *ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती प्रेरणा :–*

ऐतिहासिक कादंबरी हा 'अद्‌भुताला व वास्तविकाला साधणारा एक दुवा असतो असे म्हटले जाते. ऐतिहासिक कादंबऱ्यात अद्‌भूत कादंबऱ्यातील ऐश्वर्यशाली, इच्छापूर्तिप्रधान वातावरण कायम ठेवता येतो. ''लोकादरास पात्र झालेल्या वीर पुरूषांच्या ऐतिहासिक वा काल्पनिक कृतीचे वर्णन जीत आहे. त्या कथेवर उदात्ताची प्रभा स्वाभाविकपणे पसरते. पुर्वजांच्या गतवैभवाची आठवण काढण्यात एकतऱ्हेची विषादपुर्ण गोडी, आपुलकीही असते व ही भावना निष्क्रियतेच्या काळात विशेषच प्रिय वाटते बऱ्याच ऐतिहासिक कादंबऱ्या अशा हेतूने लिहिल्या जातात.''[३]

अद्‌भूताचा रोमांच व सत्याभासाचे समाधान हे तिचे उपपरिणाम असता, ते हेतूचे स्थान बळकावीत नाहीत. ''तिची निर्मिती इतिहासकाळातील जीवनाविषयीच्या आस्थेमुळे, अभिमानामुळे होत असते व अशी आस्था किंवा आपुलकी वाडवडिलोकांत पुण्याईश्वर सुखासीनपणे निष्क्रीयपणे जगणारांना वाटत नाही. भाविकाळात काही करण्याच्या आकांक्षेने ज्यांची मने भारली आहेत व जे काही करायचे ते आपल्या पुर्वपरंपरेशी सुसंगत असावे, पुर्वगौरवाला साजेसे असावे अशी त्यांना तळमळ वाटते, त्यांनाच ही आस्था आपुलकी वाटते''[४] रा.भी. गुंजीकर लिखित 'मोचनगड' ही पहिली ऐतिहासिक कादंबरी याच वृत्तीतून निर्माण झाली, असे मत कुसुमावती देशपांडे यांनी व्यक्त केले आहे.

ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मिती प्रेरणेचा विचार करता असे दिसते की, मराठी ऐतिहासिक नाटक व ऐतिहासिक कादंबरीची निर्मितीप्रेरणा एकच आहे. इंग्रजी अमलाच्या सुरवातीला महाराष्ट्राचे मन निष्प्रभ झाले होते. नव्या आकांक्षाकडे दृष्टी उचलून पाहण्याची शक्ती त्यांत राहिली नव्हती व जुन्या आठवणी ज्या शिल्लक होत्या त्या केवळ जवळच्या काळातील म्हणजे दुसऱ्या बाजीरावाच्या विकासी काळातीलच होत्या. त्यामुळे या काळाच्या उच्चवर्गाला अद्‌भुत कादंबरीच्या वाचनाचा विरंगुळा फार सोईचा वाटला. १८६५ ते १८७५ या अद्‌भुत कादंबरीच्या सरशीच्या दशकातच जीवनाची कळा पालटू लागली. बऱ्याच अंशी इंग्रजी संस्कारामुळे नवविचारांना चालना मिळू लागली. सार्वजनीक सभा पुणे, मुंबई, वक्तृत्वोत्तेजक सभा, प्रार्थना समाज इतयादी अनेक संस्थाचा पाया घातला गेला. निबंधमालेला प्रारंभ झाला. सद्यःकालीन जीवनाविषयी व ऐतिहासिक घटना व व्यक्ति यांच्याविषयी दृष्टीकोन बदलू लागला. ग्रॅंट डफ सारख्या इतिहासराशी टक्कर घेण्याचे धैर्य व त्याने केलेले मराठी राज्याचे व मराठेशाहीतील व्यक्तिचे वर्णन किती अज्ञानमूलक व असत्य आहे हे ठासून सांगण्याची शक्ती निळकंठराव किर्तने यांनी दाखविली व मराठयांच्या इतिहासाचे अध्ययन वेगळया रितीने सुरू झाले. काव्येतिहास संग्रहातून महाराष्ट्रातील इतिहासातून शोधनाला आरंभ झाला.

१८६१ मध्ये विनायक जनार्दन किर्तने यांचे थोरले माधवराव पेशवे हे ऐतिहासिक नाटक प्रसिध्द झाल्यानंतर सहा वर्षांनी (१८६७) विविध ज्ञान विस्तारामध्ये 'मोचनगड' नावाची रा. भी. गुंजीकर यांनी लिहिलेली 'कल्पीत गोष्ट' क्रमशः प्रसिध्द होऊ लागली, हिच मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी होय. या कादंबरीनंतर ऐतिहासिक नाटकांप्रमाणेच ऐतिहासिक कादंबऱ्याचे लेखन विपुल प्रमाणात झालेले आढळते.

स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळात मराठी वाङमय प्रकारात विपुल प्रमाणात ऐतिहासिक कादंबऱ्याची निर्मिती झाली. रा. भी. गुंजीकर लिखित 'मोचनगड' ही पहिली ऐतिहासिक कादंबरी १८६७ सालीपासून विविधज्ञानविस्तारात क्रमशः प्रसिध्द होऊ लागल्यानंतर मोठया प्रमाणात ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या जाऊ लागल्या. १८७० ते १९४७ या कालखंडात रा. भी. गुंजीकर, ह. ना. आपटे, ना. ह. आपटे, साधुदास, सहकारी कृष्ण, चि. वि. वैध, नायमाधव, वि. वा. हडप या प्रमुख ऐतिहासिक कादंबरीकारांनी ऐतिहासिक कादंबऱ्याची निर्मिती केली. स्वातंत्रपुर्व काळात 'मोचनगड', 'उषःकाल', 'वज्राघात', अजिंक्यतारा', 'दुर्दैवी रंगू' तसेच नाथमाधवांच्या स्वराज्यावरील कादंबऱ्या व वि. वा. हडपांच्या पेशवाईवरील कादंबऱ्या हे एकुणच ऐतिहासिक कादंबरीच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे आहेत. यासर्व कादंबऱ्यामध्ये 'विजयनगरचा इतिहास', 'शिवशाही', 'पेशवाई', 'रजपुतांचा इतिहास' हे विशेषकरून विषयपात्र ठरले आहेत. तर स्वातंत्र्योत्तर काळात राणजीत देसाई यांची 'स्वामी' १९६२ या लक्षवेधी ऐतिहासिक कादंबरीने मराठीतील ऐतिहासिक कादंबरीत एक नवे पर्व सुरू झाले. 'स्वामी' या कादंबरीनंतर 'श्रीमान योगी', ना.स.इनामदारयांच्या 'झेप', 'झुंज', 'मंत्रावेगळा', 'राऊ', 'शहेनशहा', य. वा. मोकाशीची 'सुर्यमंडल भेदिले', नयनतारा देसाईंची 'अर्ध्य', इंदुमती केळकर यांची 'रजिया', भिमराव कुलकर्णीचे 'ओंकार' वामन देशपांडेची 'आम्ही यातनांचे स्वामी', 'शिवाजी सावंताची 'छावा', विश्वास पाटील यांच्या 'पानीपत' यासारख्या अनेक कादंबऱ्या निर्माण झाल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर मराठी ऐतिहासिक कादंबरी, स्वातंत्र्यपुर्व ऐतिहासिक कादंबरीहून अधिक निराळी आहे. इतिहासापासून स्फुर्ती घेण्याची वर्तमानकालीन निकड मागे पडून ऐतिहासिक आदर्श पुरूषांचे उदात्तीकरण करण्याची, त्यांच्यातील 'माणूस' शोधण्याची, उपेक्षिताला न्याय व प्रतिष्ठा देण्याची धडपड ऐतिहासिक कादंबरीकर करताना दिसतात.

मराठी ऐतिहासिक कादंबरीच्या निमिर्तीप्रक्रिये संदर्भात काही ठरावीक बाबी आढळतात, त्या अशा

### • *गतकालाबाबतची स्वाभाविक जिज्ञासा :–*

भूतकालीन मानवी जीवनाबद्‌दल वाटणारे कुतुहल ही माणसाची सहज, स्वाभाविक आणि मुख्य प्रेरणा असते. माणसाला भविष्याबद्‌दल जशी उत्सुकता वाटत असते, तशीच भूतकालाबद्‌दल देखील वाटत असते. गौरवपुर्ण उज्ज्वल इतिहास अभ्यासणे, भूतकालीन महान वीर पुरूषांपासून स्फुर्ती घेणे, देशप्रेम बाळगणे हे माणसाला स्वाभाविकपणे आवडते, आपल्या पुर्वजांच्या जीवनपध्दती, त्यांचे रितिरिवाज, आशाआकांक्षा, ध्येय धोरणे, कार्ये या सर्वांबद्‌दल माणसाला औत्सुक्य

असतेच. भुतकाळ जाणल्याने भविष्यकाळात जे काही करायचे ते आपल्या पुर्वपरंपरेशी सुसंगत, पुर्वजांच्या गौरवाला साजेसे असावे असेही त्याला वाटते. अशाप्रकारे ऐतिहासिक कादंबरीकारांची भूतकालीन वास्तव जिवंत करण्याची ही एक महत्वपूर्ण प्रेरणा म्हणता येईल.

**• *सामान्यांच्या मनात इतिहासाची आवड व अभिमान निर्माण करणे :–***

कादंबरीकारांची कल्पकता आणि कलात्मक रचनापध्दती वापरून इतिहासाला मनोरंजक व सुरस बनविता येते. तसे कादंबरीच्या सहाय्याने इतिहासाला सरस बनवून सर्वसामान्य माणसाला इतिहास समजावून देता देता त्याच्या मनात इतिहासाबद्दल अभिमान जागृत करावा असेही काहींना वाटते. कॅप्टन बेलवलकर यांनी ''राष्ट्रपुरूषांच्या गौरवगाथा सांगून वाचकांच्या मनात इतिहासाविषयीचा अभिमान जागृत करणे.''[५] ही ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती प्रेरणा सांगितली आहे.

**• *अज्ञात भावसत्याचा शोध :–***

ऐतिहासिक कादंबरीचा लेखक कादंबरीच्या माध्यमातून वाचकांच्यापुढे इतिहास ठेवणे एवढयाच मर्यादीत हेतूने लेखनप्रवृत्त झालेला नसतो, रूढ आणि विकृत इतिहासापेक्षा 'वेगळे' किंवा 'अधिक' काही म्हणजेच इतिहासातील ज्ञात घटनांच्या पलिकडील भावसत्य दाखविण्याचा त्याचा प्रयत्न असतो. ऐतिहासिक ज्ञात घटनांचा अभ्यास करतांना जे नवे निराळे आकलन त्यास झालेले असते, जे नाविण्यपूर्ण ऐतिहासिक तथ्य प्रतीत झालेले असते ते सर्व भावरंगात भिजवून मांडण्याचा तो प्रयत्न करतो. त्यामुळे एकाच कालखंडातील घटनांवर अथवा ऐतिहासिक व्यक्तिंवर आधारलेल्या ऐतिहासिक कादंबरीचे स्वरूप भिन्न आढळते. उदा. पानिपतचे युध्द या घटनेवर आधारलेल्या 'दुर्देवी रंगू', 'पानिपतची मोहिम', 'पानिपत' या कादंबऱ्या अनेक बाबतीत परस्परभिन्न स्वरूपाच्या आहेत.

**• *इतिहास प्रसिध्द पुरातन वस्तुंचे दर्शन :–***

ऐतिहासिक कादंबरीची लेखन प्रेरणा केवळ इतिहासच नसते तर भूगोल देखील असते असे म्हणता येईल. कारण ''भूतकाळाबद्दल विशेष आस्था असणाऱ्या इतिहासाबद्दल प्रेम असणाऱ्या कलावंताला जुन्या ऐतिहासिक वास्तूंचे अवशेष प्राचीन किल्ले, गड, तट इत्यादी पाहताना त्यांच्यात लपलेला इतिहास दिसतो आणि तो उघड करण्याची तीव्र इच्छा त्याच्या मनात रोमांचकारी आवडीने लेखन प्रवृत्त होत असतो''[६] गो. नी. दांडेकरांचे निसर्गप्रेम किल्ले, तट, डोंगरदऱ्यातील भ्रमंती ही त्यांच्या ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती प्रेरणा आहे असे दिसून येते.

**• *समकालीन वास्तव बदलवण्याची मनीषा :–***

काही ऐतिहासिक कादंबरीकार समाजमनातील ऐतिहासिक महान व्यक्तिबद्दलच्या श्रध्देचा उपयोग करून घेऊन जनजागृती करू इच्छितात. देशभक्ती, स्वातंत्र्यप्रिती यासारख्या भावनांनी प्रेरित होऊन ऐतिहासिक कादंबरीव्दारे वर्तमानाचे यथार्थ रूप दाखविण्याचा प्रयत्न ते करतात. देश जेव्हा पारतंत्र्यात असतो तेव्हा परकीय सत्तेने निर्माण केलेला अन्याय, पारतंत्र्यात व्यक्तिविकासाची आणि समाजविकासाची होणारी गळचेपी, देशाची दुरावस्था, दडपणे, दास्य, गुलामगीरी, इत्यादी गोष्टी भूतकाळातील एखादी सदृश्य घटना निवडून ते दाखवितात आणि त्याव्दारे लोकांच्या मनात स्वातंत्र्यप्रेम जागृत करण्याचा आणि परिकीय सत्तेविरूध्द संघर्ष करण्याची मनीषा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. वर्तमानकाळातील समस्या अप्रत्यक्ष स्वरूपात भूतकाळातील सदृश्य पार्श्वभुमीव्दारे मांडून आणि सोडवून दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. यामुळे भूतकालीन घटनांचे विश्लेषण करता येते. पुर्वजांच्या चुका दाखवून वर्तमानकाळाला व भविष्यकाळाला सूचकपणे अप्रत्यक्षरित्या मार्गदर्शन करता येते. म्हणूनच ''वर्तमानाला प्रेरणा देणारी शक्ती म्हणूनच हरिभाऊ ऐतिहासिक कादंबरीच्या लेखनाकडे वळले''[७] असे वा. ल. कुलकर्णीनी म्हटले आहे.

**• *समाजाच्या अभिरूचीत झालेला बदल :–***

वर्तमानकालीन समाजाची अभिरूची बदलली की निर्मितीमध्ये तदनुरूप बदल होतात. ''कल्पनारम्य कादंबऱ्यांचा वीट आल्यावर पुन्हा ऐतिहासिक कादंबरी वाचकांना आवडू लागली. काही प्रमाणात हा चित्रपटसृष्टीचा प्रभाव म्हणावा लागेल.''[८] असे ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मितीची मिमांसा करतांना ल. ग. जोग यांनी म्हटले आहे. अभिरूची बदलामागे नाविन्याची आवड असते. तसाच काहिसा प्रकार ऐतिहासिक कादंबरीबाबत झालेला दिसतो.

**• *वर्तमानातील सामाजिक व राजकीय परिस्थितीतील बदल :–***

समाजाच्या परिवर्तन प्रक्रियेचा भाग म्हणून अथवा सत्ताधिशांचा भिन्न संस्कृतीशी संपर्क आल्यामुळे अनेकवेळा सामाजिक व राजकीय परिस्थितीत बदल घडून येतो. नव्या तत्वप्रणाली, विचारप्रणाली उदयास येऊ लागतात व त्याचवेळी जुन्या ऐतिहासिक घटनांना उजाळा मिळतो. ''अठराशे सत्तावनच्या शतसांवत्सरिक उत्सव ही सुरवातीच्या ऐतिहासिक कादंबरीशी लेखनामागील प्रेरणा असू शकते.''[९] असे बापट गोडबोले म्हणतात. तर ''१८७१ साली प्रसिध्द झालेली रा. भी. गुंजीकरांची ही पहिली ऐतिहासिक कादंबरी आहे. या कादंबरीच्या जन्माला ऐकोणविसाव्या शतकात सुरू झालेली सांस्कृतिक पुनरूत्थानाची चळवळ कारणीभूत असते.''[१०] असे विधान तत्कालीन ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मितीची आणि लोकप्रियतेची मीमांसा करण्यात आलेली आहे.

***• आदर्श व्यक्ती, आदर्श मुल्ये आणि अभिजात वृत्तीची आवड :–***

कित्येकदा वर्तमानकालीन वास्तवामध्ये सामाजिक जीवनमूल्ये नितिमूल्ये आढळेनासी झाली की मग त्या मूल्यांच्या स्थापनेसाठी लेखकांकडून प्रयत्न सुरू होतात. आज समाजात आदर्श व्यक्ति दिसत नाहीत. एकेकाळी अशा व्यक्तिंनी समाजाला कसे भारावून टाकले होते याचे प्रत्यंतर चरित्रप्रधान ऐतिहासिक कादंबऱ्यातून होते. या संदर्भात रा. ग. जाधव लिहितात. ''रणजीत देसाई, कानेटकर, इनामदार हे अभिजात वृत्तीचे लेखक आहेत. ही मनोवृत्ती परंपरेला जपणारी व संवर्धनाची असते. वर्तमानकाल मूल्यविहित आहे. या सामान्याच्या युगात असामान्य नायकाच्या शोधासाठी या अभिजात वृत्तीच्या लेखकांना गतकाळाकडे वळावे लागले. ऐतिहासिक साहित्य हे अभिजाततेच्या शोधाची सफर ठरते. इतिहास व्यवस्थाक्षम ओल्या मातीसारखा असतो. लेखक त्यास हवा तसा आकार देऊ शकतो. वर्तमानकाळ सामान्यांचे युग असल्यामुळे लेखन असामान्य नायकांचे सामान्यत्व शोधण्याचा उपक्रम करतात.''[११] आजच्या ऐतिहासिक कादंबरीकारांनी परंपरा जोपासून वाढीला लावण्यासाठी कादंबरीलेखन केले आहे, असे जाधव सुचवितात. त्यांच्या मते, आजच्या नायकप्रधान म्हणजेच चरित्रात्मक कादंबऱ्या आदर्श मानवी मूल्ये दाखवितात. त्याचप्रमाणे या महान कर्तृत्ववान आदर्श व्यक्तिच्या ठिकाणी जसे अव्दितीय दैवी गुणधर्म असले तरी ती सुध्दा माणसेच कशी होती हेही या कादंबरीकारांनी दाखविले आहे.

ऐतिहासिक कादंबरी हा इतिहास आणि साहित्य म्हणजेच विज्ञान आणि कला या दोन परस्पर विरोधाभासात्मक तत्वांचा अद्‌भुतरम्य संगम असलेला साहित्यप्रकार आहे. ''ऐतिहासिक कादंबरी ही वाङ्मयातील संकर जात आहे. एका बाजुस ऐतिहासिक सत्याचा विपर्यास झाल्याबद्दल इतिहासकार तिला दोष देण्यास टपलेला असतो तर दुसरीकडे प्रमाणाबाहेर इतिहास कादंबरीत आला म्हणजे ती नीरस होण्याची भिती असते. तारेवरील कसरतीप्रमाणे तोल सावरीत दुहेरी जबाबदारी पेलीत ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती करावी लागते.''[१०]

ऐतिहासिक कादंबरी लेखकांच्या कालापेक्षा भिन्न असे भूतकालीन जीवन व वातावरण साकार करण्याचा प्रयत्न करते असे म्हटले जाते. यातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. पहिली अशी की, लेखकाने आपल्या काळाशी–वर्तमान काळाशी संबंध नसलेल्या, प्रत्यक्ष न अनुभवलेल्या भूतकाळाचे ज्ञान करून घेऊन त्या सामाजिक व राजकिय परिस्थितीचे चित्रण जिच्यात केलेले असते, तिला ऐतिहासिक कादंबरी म्हणता येते. लेखक सुदंरच्या भूतकालीन घटना आणि व्यक्तियांच्यावर कादंबरी लिहू शकतेल. दोन्ही प्रकारच्या कादंबऱ्याचे यश हे त्यातील वैशिष्टयपूर्ण वास्तवाच्या चित्रणावर अवलंबून असेल. ते वास्तव वर्तमानकालीन वाचकांच्या अनुभवाचे असणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, भूतकालीन वातावरण जिवंतपणे उठले की काम झाले. अशा ठिकाणी व्यक्ती व घटना काल्पनीक असूनही कालचित्रण यथायोग्य होऊ शकेल आणि जर ज्ञात व्यक्ति आणि सत्य घटना तेथे असतील तर त्या कादंबरीतील ऐतिहासिकता आपोआपच महत्वाची बनेल.

डॉ. वऱ्हाडपांडे यांनी ऐतिहासिक कादंबरीचे विवेचन करतांना 'ऐतिहासिक सत्य अधिक (+) कल्पनाशक्ती किंवा प्रतिमा बरोबर (=)ऐतिहासिक कादंबरी हे सुत्र मान्य करून आपल्या मनाच्या पुष्टीसाठी जॉन बुकन, रस्कीन, विल्यम हडसन इ. विचारवंताच्या मताचा आधार घेतला आहे. रस्किनच्या मते, ''ऐतिहासिक कादंबरी ही भूतकालीन घटनांच्या विवेचनासाठी कल्पना वापरलेली असते.''[१३] प्रा. हडसनच्या मते, ''ऐतिहासिक कादंबरीकार आपल्या निर्मितीक्षम कल्पना सामर्थ्याने इतिहासातील रूक्ष व नीरस घटनांना जिवंत करीत असतो.''[१४] या दोन्ही विचारवंतांनी आपल्या व्याख्येत निव्वळ भूतकालीन घटना अथवा व्यक्ती या ऐतिहासिक कादंबरीत महत्वाच्या नसून त्या घटनांच्या आधारे निर्माण होणारे कथानक आणि त्यासाठी आवश्यक असणारी कादंबरीकाराची सृजनशील प्रतिभा यांना महत्व दिले आहे.

या विवेचनावरून ऐतिहासिक कादंबरीच्या विविध समिक्षकांनी केलेल्या विविध व्याख्यांचा परामर्श घेऊ. डॉ. जान्हवी संत ऐतिहासिक कादंबरीची व्याख्या करतांना म्हणतात, ''ऐतिहासिक कादंबरीमध्ये इतिहास व कथेच्या मूल्यांना अविष्करण लाभते. तिची उत्पत्ती आत्मविस्ताराच्या आंतरिक प्रेरणेने झालेली असते. म्हणूनच इतिहासाचा जीवनरस शोषून तरारलेली, बहरलेली भावसंपन्न कथा म्हणजे ऐतिहासिक कादंबरी होय.''[१५] इतिहासातील ज्ञात घटना आणि व्यक्तिच्या पलिकडील अज्ञात भावस्पंदनांचा शोध कल्पनेच्या आधारे ऐतिहासिक कादंबरीकार घेत असतो. लेखक हा शोध संभवनीयतेच्या कसोटीने ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मितीतून पुर्णत्वाला नेत असतो. डॉ. ल. म. भिंगारे म्हणतात, ''..... कादंबऱ्यातील वाचकांना रमविणारा घटक कथात्मक आकर्षण हा ऐतिहासिक कथावस्तूत नसून इतिहासाला ज्ञान नसलेल्या किंवा फार तर ऐतिहासिक घटनेशी विरोधी नाही म्हणून संभवनीय म्हणता येईल, अशा काल्पनीक कथांत आहे.''[१६] ऐतिहासिक कादंबरीमधील कल्पकता ही भूतकालीन वास्तव जिवंत करण्यासाठी वापरली जात असल्यामुळे ती कल्पकता न राहता 'कलात्मक कल्पकता' होत असते. म्हणजे मनाने विशिष्ठ काळात प्रवेश करून जाणवलेल्या अभिनव नावीन्यपूर्ण सत्याचा अविष्कार करणे. ऐतिहासिक कादंबरीचा लेखक आपली उपजत सृजनशिलता आणि कलात्मक कल्पकता अशा दोन्हीचा वापर करून इतिहाससापेक्ष अशा

स्वतंत्र पुनर्सृष्टीचा नवनिर्मिती करीत असतो.

ऐतिहासिक कादंबरीची ही विविध वैशिष्टे सांगणारी ऐतिहासिक कादंबरीची व्याख्या पुढीलप्रमाणे होईल. ''लेखकाच्या युगाच्या दुरकालीन युगातील भूतकालीन घटना व्यक्ती आणि परिस्थितीच्या पुराव्याने सिध्द झालेल्या ज्ञात निष्कर्षावर आधारीत तत्कालीन वातावरणाची पुननिर्मिती कलात्मक कल्पकेच्याव्दारे ज्या कादंबरीत केलेली असते. ती ऐतिहासिक कादंबरी होय.''[१७]

ऐतिहासिक कादंबरीमध्ये इतिहास आणि कल्पीत यांचे एकजीव मिश्रण असते या मिश्रणाचा आधारतत्व म्हणून उपयोग करणे देखील अवाजवीच होते. कारण ऐतिहासिक कादंबरीकाराने आपल्या कादंबरीत इतिहासाचा वापर कधी अत्यल्प केलेला असतो. तर कधी पुरेपुर केलेला असतो. त्याचप्रमाणे कल्पकतेचा वापर देखील कधी अल्प तर कधी अधिक असतो. याबाबत लेखकाला पुर्ण स्वातंत्र्य असते. ऐतिहासिक कादंबरीचे जे प्रमुख घटक आहेत, त्या घटकांपैकी कोणत्या घटकाला कादंबरीत प्राधान्य मिळालेले आहे, या आधारतत्वानुसार ऐतिहासिक कादंबरीचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार १) घटनाप्रधान ऐतिहासिक कादंबरी (२) व्यक्तिप्रधान ऐतिहासिक कादंबरी अथवा चरित्रप्रधान (३) वातावरणप्रधान ऐतिहासिक कादंबरी अथवा कालचित्रमणात्मक ऐतिहासिक कादंबरी, असे भेद मानण्यात येतात.

ऐतिहासिक कादंबरी इतिहासातील कोणत्या कालखंडावर आधारीत आहे त्यावरून ही कादंबरीचे वर्गीकरण करण्यात येते. त्यानुसार (१) शिवकालावर आधारीत कादंबरी (२) पेशवेकालावर आधारीत कादंबरी (३) इंग्रजकालावर आधारीत कादंबऱ्या (४) अखील भारतीय इतिहासाशी संबंधीत कादंबऱ्या (५) पौराणिक कादंबऱ्या ऐतिहासिक कादंबरी हा वाङमय प्रकार मराठी भाषेत 'हिस्टारिकल नॉवेल' च्या अनुकरणाने आलेला आहे. त्यामुळे इंग्रजी भाषेतील या वाङमयप्रकाराची वैशिष्टये व त्यातील भेद लक्षात घेऊन मराठी ऐतिहासिक कादंबरीचे रूप तपासून साम्यभेद नोंदविणे हेही वर्गीकरणाचे आधारतत्व होऊ शकते. त्यानुसार 'ऐतिहासिक' ते रोमान्स (नवलिक) व 'ऐतिहासिक कादंबरी' असेही भेद मानल्या गेलेले आहेत.

ऐतिहासिक कादंबरीच्या रचनातंत्राचे स्वरूप बघीतल्यानंतर 'ऐतिहासिक कादंबरी' व 'ऐतिहासिक नाटक' या दोन्ही वाङमय प्रकारात तुलनात्मकदृष्टया काही साम्यभेद जाणवतात ते असे

### *कल्पिताला महत्व :–*

ऐतिहासिक कादंबरी व ऐतिहासिक नाटक या वाङमय प्रकारात 'इतिहास' हे प्रमाणभूत तत्व जोपासून कादंबरीकार व नाटककार इतिहासानी ठरविलेल्या निदानांच्या व अनुमानांच्या सहयाने ऐतिहासिक सत्य घटनेला आपल्या कल्पनासृष्टीने ती सत्य घटना जिवंत स्वरूपात रसिकांसमोर उभी करतो. सत्य आणि कल्पीत यांच्या समन्वयातून ऐतिहासिक कलाकृती आकार धारण करते. ऐतिहासिक कलाकृति हे केवळ सत्य नसते तर सत्याचे सचेतन रूप असते. गतकाळात जमा झालेल्या ऐतिहासिकाला कलेच्या संजीवनीचा स्पर्श होऊन ते ऐतिहासिक जीवंत स्वरूपात प्रेक्षकांसमोर सादर करण्याचे सामर्थ्य प्रतिवंताच्या ठिकाणी असते. ऐतिहासिक सत्य घटनेला कल्पनेचा साज देऊन तिच्या मुळ स्वरूपाला यतकिंचीतही झळ लागू न देता सौंदर्यमय स्वरूपात सादर करणे हे ऐतिहासिक कलाकृतिचे कार्य असते. असा प्रयत्न ऐतिहासिक कादंबरी व नाटकात केल्या जातो.

### *कथानक :–*

एडविन म्यूरच्या मते, ''एका विशिष्ट तत्वाच्या अनुरोधाने एकत्र आणलेले घटना प्रसंग म्हणजे कथानक होय.''[१८] दुरकालीन एखादा कालखंड घेऊन त्यातील महत्वपूर्ण घटना व प्रसंगांना निश्चित दृष्टिकोनातून ऐतिहासिक कादंबरीमध्ये संघटीत केलेले असते. त्या विशिष्ट कालखंडाचे संपूर्ण चित्र रेखाटतांना एक घटना मागील घटनेचा परिणाम तर पुढील नव्या घटनेला जन्म देणारी, अशी उत्सुकतावर्धक आणि कार्यकारण तत्व सांभाळणारी माध्यमे त्यामध्ये केलेली असते. कथासुत्राचा महत्वाचा धागा म्हणजे एखादे विशिष्ट तत्व अथवा विचार या घटनांच्या साखळीत अनुस्युत असतो. भूतकालीन घटनांच्या जोडीने काही काल्पनिक प्रसंग जरी लेखकाने घातले तरी ते प्रसंग केवळ संभाव्यतेची कसोटी लागू पडणारे असून चालत नाही. तर घटना प्रसंगाची ही संबंध साखळीच संभाव्य, सुसंगत आणि परस्पर संबंध स्वरूपाची असावी लागते. इतिहासातील ज्ञात घटनांच्या आधारे आपली कल्पकता वापरून तो त्या घटनांमागील भावसत्य व कार्यकारण भाव जाणून घेत असतो. या प्रक्रियेतून त्याला जी नवी अनुभूती प्राप्त होते, तिचाच अविष्कार तो ऐतिहासिक कादंबरीतील कथानकाव्दारे करतो. तर नाटक हे दृश्य आणि श्राव्य असे दोन्ही प्रकारचे काव्य असल्याने इतर कोणत्याही कलाकृतिपेक्षा प्रेक्षकांच्या मनावर भावनात्मक परिणाम घडविण्याचे नाट्याकृतीचे सामर्थ्य अधिक असते. हा भावनात्मक परिणाम साधणे हे ऐतिहासिक नाट्याकृतिचे उद्दिष्टय असते. विविध पात्र प्रसंगाची योजना कलेचा एकात्म परिणाम साधण्याकरिताच केलेली असते. हे तत्व ऐतिहासिक नाटककाराला विसरून चालता येत नाही. ह्याकरीता प्रत्येक प्रसंग, पात्र व संवाद हे कथानकाला गती देऊन अखेर एकात्मक परिणाम साधण्याकरिताच नाटककार उपयोजित असतो.

ऐतिहासिक नाटककार जी घटना अथवा जी व्यक्ति नाट्यावस्तुकरीता निवडतो ती सामान्यपणे लोकांना माहित असलेली असावी. कारण 'नाटक हे गर्दिकरिता असते' हे नाटकाचे पहिले व महत्वाचे सुत्र आहे. लोकांच्या सहानुभूतीचा ओघ जिच्याकडे वळला आहे, जिच्याबद्दल लोकमनात कुतुहल बुध्दी व आदर आहे. अशी एखादी घटना व व्यक्ती

नाटककार निवडीत असतो. कारण नाट्याकृतिची परिणामकारकता साधण्याला ते सोईचे होते.

*संघर्ष चित्रण :–*

संघर्ष हा कादंबरीच्या व नाटकाच्या कथानकाचा प्राण असतो. कथानक उत्सुकतावर्धक आणि आकर्षक होण्यासाठी कादंबरीकार व नाटककार संघर्षमय प्रसंगाची योजना करीत असतो. वास्तवातल्या प्रमाणे कादंबरीतही धन, वासना, सत्ता यातील गोष्टीसाठी झालेला संघर्ष दाखविलेला असतो. संघर्षाची प्रत्यक्ष कादंबरीतील मांडणी व्यक्तिविरूध्द व्यक्ती, व्यक्तिविरूध्द समाज, व्यक्तिविरूध्द परिस्थिती, अथवा नियती या स्वरूपात किंवा एकाच व्यक्तिच्या मनातील विकार आणि विचार यांच्यातील आंदोलने या स्वरूपात झालेली असते. कथानकातील व्यक्तिच्या जीवनातील संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारे नाट्या उभे करीत असतांना कादंबरीकार कोणत्या पातळीवर संघर्ष निवडतो आणि तो शक्य तितक्या उठावदारपणे कसा रंगवितो यावर त्या कादंबरीचे पुष्कळशे यश असते. संघर्ष हा नाट्या वाङमयाचाही प्राण असल्याने विशिष्ठ परिस्थितीत विशिष्ठ स्वभावाच्या व्यक्ती कशा वागतात ह्याचा सुक्ष्म अभ्यास नाटककाराला असल्याखेरीज व्यक्ति आणि प्रसंग ह्यांच्यातील दुवे त्याला साधता येणार नाहीत. नाट्याकृतीतील प्रभावी संघर्षाची निर्मिती ज्यामधून होते, तो मानवी स्वभाव हेच नाट्यावाङमयाचे प्राणभूत तत्व होय. इतिहासातील व्यक्ती प्रत्यक्ष आपल्या समोर वावरत आहेत इतका जीवंतपणा व्यक्तिचित्रणात नाटककाराला आणावा लागतो.

*मानवी स्वभावाचे सुक्ष्मज्ञान :–*

ऐतिहासिक कादंबरीकाराला किंवा ऐतिहासिक नाटककाराला मानवी स्वभावाचे सुक्ष्म ज्ञान असणे अत्यंत गरजेचे असते. ''एकच मनुष्य स्वभाव अनेक घटनांच्या परिघातून फिरतांना वेगवेगळया स्वरूपाच्या प्रतिक्रिया घडतात. हे लेखकाने जाणले पाहिजे व तो बदलत असताही संगतवात बदलतो हे त्याने विसरून चालणार नाही, मनुष्यस्वभाव बदलण्यातही काही संगती असते. कोणतीही गोष्ट घडत असतांना विशिष्ट स्वभावाच्या मनोवृत्तीचा मनुष्य कशा प्रकारचे वर्तन करील हे काही विशेष अनुमान प्रमाणांच्या आधारे ठरविता येणे शक्य आहे. इतिहासकालातील काही लोकोत्तर पुरूषांची चरित्रे पारखतांना हिच दृष्टी प्रामुख्याने बाळगणे अगत्याचे असते. इतिहासावर कथानकाची सिध्दता करू पाहणाऱ्याला इतिहासाचे जसे सुक्ष्म अवलोकन करावे लागते तसे इतिहासात प्रतिष्ठा पावलेल्या लहानथोर व्यक्तिच्या वर्तनक्रमाची आणि तो वर्तनक्रम घडवून आणणाऱ्या त्यांच्या मनश्चर्येची उत्कृष्टरीतीने तर्कग्राह्य छाननी करण्याचे कार्य करावे लागते.''१६ असा प्रयत्न ऐतिहासिक कादंबरी व ऐतिहासिक नाटकात लेखक करतांना दिसतो.

*भाषा :–*

कादंबरी व नाटक ही आत्मविष्कारार्थ नसतात तर निवेदनार्थ असतात, म्हणजेच येथे वाचकांचा संबंध येतो. कादंबरीकारांनी व नाटककारांनी ऐतिहासिक सत्य व वर्तमानकालीन वाचक या दोहोंचे भान ठेऊन समकालीन भाषा व ऐतिहासिक भाषा याचा वापर करावयास हवा. 'ऐतिहासिक' या कालवाचक शब्दाला हरिभाऊंनी 'गतकाल' म्हटले आहे. ते आपल्या सामाजिक कादंबऱ्यांना 'आजकालच्या', तर ऐतिहासिक कादंबऱ्यांना 'गतकाल'च्या म्हणतात. गतकालच्या या शब्दातून नजीकच्या भूतकाळ आपोआपच कळला जातो. दर बारा कोसावर भाषा बदलते. पण स्थुलमानाने गेली दिडशे वर्ष मराठीतील लेखनाची भाषा सारखीच आहे आणि म्हणून भाषिकदृष्टीनेही आनंदी गोपाळ, दुर्दम्य व रघुनाथाची बखर यातील पात्रांची भाषा ही आजची भाषाच आहे. फक्त मधुन मधुन वेळोवेळच्या भाषिक लकबी वा वाक्यप्रकार वैगेरे त्यात आढळतात. त्यामुळे त्या त्या पात्र प्रसंगाची वास्तवता वाढते.

कादंबरीच्या मानाने नाटकांत मात्र ऐतिहासिकाचे 'फिल' येण्यासाठी भाषेचा वापर १९६० पुर्वीपासून म्हणजे औंधकाराच्या 'बेबंदशाही' व 'आग्रयाहून सुटका' या नाटकापासून केल्या जाऊ लागला. बखरीतील उर्दु, फारशी शब्दांचा सुंदर मेळ नाटकात येऊ लागला. असाच प्रयत्न १९६० नंतर 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'बया दार उघड', 'हर हर महादेव' यासारख्या कादंबऱ्यातून होऊ लागला.

नाटक आणि कादंबरी हे साहित्यप्रकार प्रामुख्याने निवेदनार्थ असल्याने आणि वाचक व प्रेक्षक हे आजचे असल्याने भाषेच्या संदर्भात नाटककारांपुढे वा कादंबरीकारांपुढे मोठी समस्या निर्माण होते. शिवाय भाषा ही व्यवहारातली वापरली जात असल्याने ती केवळ साधन न राहता साहित्यीक बनली पाहिजे. पण पुनः आजच्या भाषेचा व गतकालीन भाषेचा त्यात मेळही घातला पाहिजे. मराठी ऐतिहासिक कादंबरी व नाटकात असा मेळ घालण्याचा प्रयत्न काही ऐतिहासिक कादंबरीकातून व नाटकारांनी केल्याचे प्रत्ययास येते.

*ऐतिहासिक नाटक आणि ऐतिहासिक कादंबरी :–*

ऐतिहासिक नाटक व ऐतिहासिक कादंबरी हे वाङमय प्रकार आपल्या प्रकृतीधर्माने वेगवेगळे आहेत. या दोन्ही वाङमय प्रकारात बाह्या जगाचे दर्शन असते. त्यातील व्यक्तिच्या कृत्यातून आणि कृतीतून व्यक्तिचे अंतर्मन, तिच्या भावभावना व विचार, बाह्याविश्वामुळे निर्माण झालेल्या प्रतिक्रियांसह व्यक्त झालेल्या असतात. नाटक आणि कादंबरी वस्तुनिष्ठ वास्तवाचे समग्र चित्र रेखाटत असतात. एखादी शोकांतिका आणि कादंबरी जीवन प्रक्रियांच्या समग्रतेचे चित्रण

करीत असेल. परंतु दोहोतील समग्रता ही सापेक्ष स्वरूपाची असते. ''मानव जातीच्या सांस्कृतीक जीवनाला त्यांचा परिणाम कसा जागृत करतो आणि रसिकांच्या भावभावनांना तो कसा प्रक्षुब्ध करतो हेच उद्दिष्टय ऐतिहासिक कादंबरी आणि नाटक यांचे असते. असा परिणाम न साधणाऱ्या कलाकृती अपयशी मानल्या गेलेल्या आहेत. केवळ एखाद्या व्यक्तीच्या स्वाभाविक व सत्य स्वरूपाच्या जीवनविषयक प्रतिक्रिया किंवा घाटातील कलात्मकता या समग्र जीवनाच्या भावमयतेची जागा घेऊ शकत नाहीत. या घाटातून आशयातून सापेक्ष समग्र जीवाची प्रतिमा प्रत्यक्षात जागणवली पाहिजे. व्यक्ती आणि समाज यांच्या नियतीमधून जीवनाचे प्रमाणित स्वरूप व्यक्त व्हावयास पाहिजे. केवळ त्यातील संबंधाचे ज्ञान पुरेसे नव्हे. अशा कलाकृतीमधून महत्वाच्या जीवनविषयक तत्वाचे दर्शन झाले पाहिजे आणि ते मूर्त स्वरूपाच्या घटना-प्रसंगातून व व्यक्तिदर्शनातून प्रत्ययाला आले पाहिजे यासाठीच कलावंत ऐतिहासिक व्यक्तिची पुनर्निर्मिती करतो. त्यावेळी त्याला व्यक्ती व तीची नियती यांचे संबंध लक्षात घ्यावे लागतात. परंतू नाटकात अगर कादंबरीत जीवनाच्या समग्रतेचा संबंध सोडून द्यावा लागतो. कारण त्यामधील प्रतिभासांचे विश्व हे मर्यादीत व्यक्तिंचे व त्यांच्या नियतीचे असते. मानवी समाजाची ही समग्रता दैनंदिन जीवन व्यवहारातून प्रत्ययाला यायला हवी.''[२०]

नाटकात विशिष्ट जीवन प्रक्रियेची मांडणी असते. एका विशिष्ट केंद्रबिंदुभोवती या समग्रतेचे केंद्रीकरण केलेले असते आणि त्यामुळेच त्या केंद्रबिंदूभोवती नाट्यापूर्ण आघात असतात. मानवी उद्दिष्टांशी निगडीत असे संघर्ष असतात. नाटकामध्ये क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारे व उत्कटतेच्या टोकाला घेऊन जाणारे संघर्षपूर्ण आणि गंभीर असे जीवनदर्शी प्रसंग आलेले असतात. त्यातील सर्व प्रेरणांचे ताण मध्यवर्ती संघर्षबिंदूकडे खेचले जातात. त्यातून जीवनमूल्यांचे दर्शन नव्याने घडतांना दिसते.

ऐतिहासिक नाटक व कादंबरी या दोन्ही वाङमय प्रकारात 'ऐतिहासिकाला' विशेष महत्व आहे. परंतु कादंबरी आणि नाटक हे प्रकृतीदृष्टया भिन्न स्वरूपाचे आहे. नाटकाला ज्या मर्यादा सांभाळाव्या लागतात तशा कादंबरीला सांभाळाव्या लागत नाही. कादंबरी या वाङमयप्रकारात निवेदनाला भरपूर वाव असतो. त्यामुळे ऐतिहासिक कादंबरीत एखाद्या नायकाच्या जीवनाचा समग्र पट उभा राहतो. नाटक हे दृक व श्राव्य असे दोन्ही प्रकारचे काव्य असल्याने इतर कोणत्याही कलाकृतिपेक्षा प्रेक्षकांच्या मनावर भावनात्मक परिणाम घडविण्याचे सामर्थ्य नाटकात असते. प्रमुख व्यक्तिच्या अंतरंगातील भावसंघर्ष, संवाद आणि कृती ह्यांच्या सहाय्याने चित्तवेधक स्वरूपात प्रेक्षकांच्या समोर उभा करणे हेच ऐतिहासिक नाटकांचे उद्दिष्ठ असते.

### *संदर्भ ग्रंथ :*

१. माटे गो. ची. – 'ऐतिहासिक कादंबरी' नवयुग, वर्ष – ७, अंक १० (ऑक्टो-१९२०) पृष्ठ क्र. ६००
२.ग्रामोपाध्ये ग. ब. – 'मराठीतील ऐतिहासिक साहित्यकृती' गोमंतक मराठी अकादमी, पणजी गोवा, १९९० पृष्ठ क्र. २१
३.देशपांडे कुसुमावती – 'मराठीतील कादंबरी' (पहिले शतक) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई २० जुलै १९५३, पृष्ठ क्र. ४१
४.तत्रैव –पृष्ठ क्र. ४५
५. बेलवलकर कॅप्टन –'शर्थीन राज्य केलं', मॅजेस्टिक प्रकाशन पुणे – १९९९ पृष्ठ क्र. १०
६.शहा वि. भा. – 'मराठी ऐतिहासिक कादंबरी एक अभ्यास' मेहता पब्लिशींग हाऊस पुणे – १९९८, पृष्ठ क्र. २०
७.कुलकर्णी वा. ल. – 'मराठी वाङमयाचा इतिहास' खंड – ५, संपादीत, रा. श्री. जोग, महाराष्ट्र साहित्य परिषद मुंबई-१९७३ पृष्ठ क्र. ४५
८. जोग ल. ग. – 'मराठी कादंबरी' व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७२ पृष्ठ क्र. १९७
९. बापट व गोडबोले – 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास' व्हिनस प्रकाशन पुणे १९७३, पृष्ठ क्र. १९७
१०. देशपांडे कुसुमावती – 'मराठी कादंबरी पहिले शतक' मुंबई मराठी साहित्य संघ, १९७५ पृष्ठ क्र. ३९
११. जाधव रा. ग. – 'नववाङमयीन प्रवृत्ती व प्रमेये' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे १९७२, पृष्ठ क्र. १५४
१२. शहा वि. भा. – 'मराठी ऐतिहासिक कादंबरी एक अभ्यास' मेहता पब्लिशींग हाऊस पुणे १९९८, पृष्ठ क्र. ६४
१३. वऱ्हाडपांडे ल. म.–रस्कीन, भ्रमर परागु नेती, विजय – १९७३ लेख, ऐतिहासिक कादंबरी, पृष्ठ क्र. १९
१४.तत्रैव –पृष्ठ क्र. २१
१५.संत जान्हवी –'चरित्र, इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी' आलोचना मार्च १९७१, पृष्ठ क्र. २३
१६.भिंगारे ल. म. –'हरिभाऊ' मोघे प्रकाशन, कोल्हापूर १९५९, पृष्ठ क्र. ३१८
१७.शहा वि. भा. –'मराठी ऐतिहासिक कादंबरी : एक अभ्यास' मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे १९९८ पृष्ठ क्र. ६८
१८.तत्रैव –पृष्ठ क्र. ७०
१९.सरदेसाई माया –'भारतीय रंगभूमीची परंपरा' स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९९९, पृष्ठ क्र. ११३
२०.शहा. वि. भा. –मराठीतील ऐतिहासिक कादंबरी : एक अभ्यास' मेहता पब्लिशींग हाऊस पुणे, १९९८, पृष्ठ क्र. २९८



*प्रा. प्रफुल्ल तु. बन्सोड*
*मराठी विभाग , राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय,चिमूर, जि. चंद्रपूर (म.रा.)*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org